दहावी-बारावीचे निकाल मेच्या सुरवातीलाच?

गतवर्षीपेक्षा लवकर निकालाची शक्यता; तपासणी वेगात



■ सकाळ वृत्तसेवा

हिंगोली, ता. ३० : शिक्षण मंडळातर्फे घेतलेल्या दहावी व बारावीच्या परीक्षांचा निकाल यंदा गतवर्षीच्या तुलनेत लवकर जाहीर होण्याची शक्यता आहे. उत्तरपत्रिका तपासणीचे काम वेगाने सुरू असून शिक्षकांच्या सहकार्याने प्रक्रिया सुरळीत पार पडत आहे. गतवर्षी बारावीचा निकाल २१ मे, तर दहावीचा निकाल २७ मे रोजी जाहीर झाला होता. मात्र, यंदा मे महिन्याच्या सुरवातीलाच निकाल जाहीर होईल, असा अंदाज मंडळातील सूत्रांनी व्यक्त केला आहे.

यंदा बारावी व दहावीच्या परीक्षा १० फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत पार पडल्या. बारावीच्या परीक्षेला १५ लाख ३२ हजार ८६२ विद्यार्थी, तर दहावीच्या परीक्षेसाठी १६ लाख १४ हजार ९८७ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. त्यामुळे परीक्षा संपताच उत्तरपत्रिका तपासणीचे काम तातडीने सुरू केले. यंदा शिक्षक संघटनांकडून उत्तरपत्रिका तपासणीवर कोणताही बहिष्कार टाकण्यात आलेला नाही. त्यामुळे गतीने तपासणी सुरू झाली. मागील काही वर्षांत विविध प्रलंबित मागण्यांसाठी शिक्षकांनी तपासणीवर बहिष्कार टाकल्याने निकाल प्रक्रियेत विलंब होत असे. मात्र यंदा शिक्षकांनी सहकार्यामुळे तपासणीचे काम नियोजित वेळेत सुरू आहे.

६० टक्के उत्तरपत्रिका तपासणी

■ **२८ मार्चपर्यंत बारावीच्या सुमारे ६० टक्के उत्तरपत्रिकांची तपासणी पूर्ण झाली आहे, तर दहावीच्या उत्तरपत्रिकांची तपासणीही सुमारे ५० टक्क्यांपर्यंत पूर्ण झाली आहे. ही गती कायम राहिल्यास एप्रिलअखेरपर्यंत तपासणीचे बहुतांश काम पूर्ण होण्याची शक्यता आहे. त्यानंतर गुणनोंदणी, पडताळणी, निकाल जाहीर करण्याची प्रक्रिया वेगाने पार पडणार आहे.**

विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेस मिळणार वेळ

■ **यंदा दहावी-बारावीचा निकाल लवकर जाहीर झाल्यास विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक टप्प्यांसाठी वेळेत नियोजन करता येणार आहे. बारावीनंतर व्यावसायिक व पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे, तर दहावीच्या विद्यार्थ्यांनाही अकरावी प्रवेश प्रक्रियेसाठी पुरेसा कालावधी मिळेल.**

जनावरांची अवैध वाहतूक; पोलिसात दोघांवर गुन्हा

आखाडा बाळापूर : जनावरांची अवैध वाहतूक केल्याप्रकरणी रविवारी (ता. २९) दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. आखाडा बाळापूर पोलिस ठाणे हद्दीत येणाऱ्या वारंगा फाटा येथील आठवडे बाजार रोडवर ही घटना उघडकीस आली. बालापूर ते नांदेड जाणाऱ्या रस्त्यावर कारवाई करण्यात आली. या प्रकरणी प्रभाकर कोंडीबा भोग (वय ३८, रा. आखाडा बाळापूर) यांनी तक्रार दिली आहे. गजानन कोडबाराव जगदाळे (वय ३५) व नागोराव गुडेराव कदम (वय ३६, दोघेही रा. पिंपरी खुर्द, ता. कळमनुरी) अशी संशयित आरोपींची नावे आहेत. आरोपींनी बोलेरो पिकअप वाहनातून (एमएच ३८ एस २८५३) जनावरांची बेकायदेशीर वाहतूक केली. पोलिसांना तीन लाख रुपये किमतीचे वाहन आणि जनावरे जप्त करण्यात केली. यात बैल व गोवंशीय जनावरांचा समावेश असून त्यांची किंमत तीन लाख ७३ हजार रुपये आहे. या प्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल झाला.

अवतीभवती

जमाते इस्लामी महिला, जीआयओतर्फे ईद मिलन

शिरड शहापूर : येथे जमाते इस्लामी हिंद महिला शाखा आणि गर्ल्स इस्लामिक ऑर्गनायझेशन ऑफ इंडिया (जीआयओ) यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी ईदमिलन कार्यक्रम घेण्यात आला. भारतीय संस्कृतीची जोपासना, राष्ट्रीय एकात्मता, बंधुत्व, प्रेम आणि जातीय सलोखा वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या स्त्री शक्तीचा आणि त्यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी प्रमुख पाहुण्यांचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जमाते इस्लामी महिला शाखेच्या जिल्हाध्यक्षा शबाना बेगम होत्या. प्रमुख वक्त्या म्हणून डॉ. आयशा पठाण यांनी मार्गदर्शन केले. नगरसेविका नंदा शशिकुमार कुलथे, शकुंतला गोपाळसा सातपुते, तबसूम बेगम इरफान आणि खुर्शिदा बेगम मजीद कुरेशी यावेळी उपस्थित होत्या. कार्यक्रमात विविध क्षेत्रातील महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. अशा उपक्रमांमुळे समाजात आपसात प्रेम आणि आदर वाढण्यास मदत होते, असे मत मान्यवरांनी मांडले. पुढील काळातही अशा कार्यक्रमांचे आयोजन करावे आणि त्यात सक्रिय सहभाग घेण्याची हमी त्यांनी दिली.

केळी ४०० रुपये क्विंटल; पीक उत्पादक संकटात

जवळा पांचाळ : कळमनुरी तालुक्यातील जवळा पांचाळ परिसरात यंदा निसर्गाच्या लहरीपणासोबतच आता बाजारभावाच्या घसरणीमुळे केळी उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. केळीला केवळ ४०० रुपये प्रति क्विंटल असा मातीमोल भाव मिळत असल्याने शेतीचा खर्च निघणेही कठीण झाले आहे. जवळा पांचाळ भागातील वडगाव, वसफळ, रेडगाव, डिग्रस, सोलापूर अनेक शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने आणि लाखो रुपये खर्च करून केळीच्या बागा फुलवल्या होत्या. मात्र, आता काढणीच्या वेळीच दर मोठ्या प्रमाणावर घटल्याने शेतकऱ्यांच्या पदरी निराशा पडत आहे. खते, औषध फवारणी, मजुरी आणि वाहतूक खर्च विचारात घेता ४०० रुपये भाव हा अत्यंत तुटपुंजा आहे. बाजारपेठेत मिळणारा दर पाहता केळी फेकून देण्याची वेळ आली आहे, अशी प्रतिक्रिया डिग्रस परिसरातील शेतकरी प्रदीप खंडारे यांनी दिली. शासनाने आणि संबंधित विभागाने लक्ष देऊन केळी उत्पादकांना योग्य हमीभाव मिळवून द्यावा किंवा नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी विजय मोरे यांनी केली आहे.

हयातनगर जि.प. शाळेत सेवकपद रिक्त; स्वच्छतेसह कामकाज ठप्प

हयातनगर, ता. ३० (बातमीदार) : येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत गेल्या अनेक वर्षांपासून सेवकाचे पद रिक्त असल्याने शालेय स्वच्छतेसह इतर कामकाजावर परिणाम होत आहे. वारंवार मागणी करूनही शिक्षण विभागाकडून दुर्लक्ष होत असल्याने तातडीने सेवकपदाची भरती करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

हयातनगर जि.प. माध्यमिक शाळा ही परिसरातील महत्त्वाची शाळा असून, येथे विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. शालेय कामकाजात मदत करण्यासाठी तसेच शाळेच्या परिसराची निगा राखण्यासाठी पूर्णवेळ सेवकाची नितांत गरज आहे. मात्र, अनेक वर्षांपासून सेवकाचे पद भरले नसल्याने शाळेच्या साफसफाईपासून कार्यालयातील किरकोळ कामांपर्यंत सर्वच बाबींमध्ये अडचणी निर्माण झाल्या आहेत.गावातील नागरिकांनी व शाळा व्यवस्थापन समितीने यापूर्वी अनेकदा संबंधित विभागाकडे निवेदने देऊन समस्या मांडली आहे. मात्र, प्रशासनाकडून केवळ आश्वासन देण्यात आले. अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही.



शाळा व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून आम्ही वेळोवेळी रिक्त जागेचा प्रश्न मांडला. माध्यमिक शाळेचा विस्तार आणि कामाचा व्याप पाहता सेवकाची नियुक्ती होणे गरजेची आहे. संबंधित विभागाने दखल घेऊन तातडीने पदनिर्मिती करावी.

-कविता सारंग, अध्यक्ष, शाळा व्यवस्थापन समिती, हयातनगर



शाळेत सेवकाचे पद नसल्यामुळे अनेक छोटी-मोठी कामे प्रलंबित राहतात. आम्ही वारंवार पाठपुरावा केला. पण प्रशासन याकडे लक्ष द्यायला तयार नाही. तातडीने सेवक पद भरले नाही, तर आम्हाला लोकशाही मार्गाने आंदोलन करावे लागेल.

-बालाजी सारंग, ग्रामस्थ, हयातनगर

या दिरंगाईमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वातावरणावर परिणाम होत असल्याची भावना पालकांनी व्यक्त केली आहे.




जवळा बाजार : जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेतील विजेता निवासी हायस्कूलच्या मुलींचा संघ.

मुलींनी पटकावले ११ हजारांचे बक्षीस

जवळा बाजार : पेठवडगाव येथे वसुंधरा फाउंडेशनामार्फत आयोजित जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत निवासी हायस्कूल- बाराशिवच्या मुलीच्या संघाने ११ हजार रुपयांचे बक्षीस पटकावले.

श्रीपतराव काटकर वसुंधरा फाउंडेशनतर्फे मातृत्व सन्मानानिमित्त मुलींच्या कबड्डी स्पर्धा पेठवडगाव येथील प्रहरी सैनिकी शाळेत ५१ किलो वजनी गटात एक गाव एक संघ एक शाळा पद्धतीने २८ मार्चला घेण्यात आल्या. यामध्ये निवासी हायस्कूल शाळेतील मुलींच्या कबड्डी संघाने प्रशिक्षक ऋषिकेश हलगे, गोविंद मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धेत सहभाग घेऊन द्वितीय क्रमांकाचे, अकरा हजार रुपयांचे पारितोषक पटकावले. मुलींचा अंतिम सामना पाहण्यासाठी संस्थेचे सहसचिव प्रा. गजानन मुळे, प्रा.व्ही.टी. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. कबड्डी संघातील विद्यार्थी व प्रशिक्षक ऋषिकेश हलगे, गोविंद मुळे यांचे संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग कदम, उपाध्यक्ष यादवराव कदम, मुनीर पटेल, सचिव विक्रम शिंदे, सहसचिव प्रा. गजानन मुळे, संदीप कदम, कोषाध्यक्ष डॉ. रमेश नवले, ज्येष्ठ संचालक मुरलीधर मुळे, प्रा.बी.डी. कदम, विश्वनाथराव कदम, आबासाहेब कदम, सुदामराव दशरथे, नारायणराव पावडे, धोंडिराम अंभोरे, विश्वनाथ कदम, पंढरीनाथ कदम, अफजल पटेल, प्राचार्या सुनीता कातोरे, उपमुख्याध्यापक अशोक दाडगे, पर्यवेक्षक लक्ष्मीकांत कोपले यांनी अभिनंदन केले.



इसापूर धरणाचे 'राजे नोवसाजी नाईक जलाशय' नामकरण करा

जलसंपदा विभागाला सभापती प्रा. राम शिंदे यांचे निर्देश

कळमनुरी, ता. ३० (बातमीदार) : इसापूर धरणाला 'आद्य क्रांतिवीर राजे नोवसाजी नाईक जलाशय' असे नामकरण करण्याच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी संबंधित विभागांना आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच धरण परिसरात राजे नोवसाजी नाईक यांचे स्मारक उभारून त्या ठिकाणाचा पर्यटनदृष्ट्या विकास करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

या संदर्भात विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी जलसंपदा विभागाला पत्र पाठवून शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत निर्देश दिले आहेत. जलसंपदा विभागाने यापूर्वीच इसापूर 'आद्य क्रांतिवीर राजे नोवसाजी नाईक जलाशय' असे नाव देण्याचा शासन निर्णय मंजूर केला आहे.

मात्र, या निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी अद्याप पूर्णपणे झालेली नाही. याच पार्श्वभूमीवर पैनगंगा खोऱ्यातील, धरण परिसरातील मौजे डोंगरगाव नाका (ता. कळमनुरी) येथील सर्व्हे क्रमांक १४० मध्ये जलसंपदा विभागामार्फत राजे नोवसाजी नाईक यांचे स्मारक उभारण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच परिसराचा पर्यटनदृष्ट्या विकास करून ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित करण्याची मागणी नगरसेविका नम्रता प्रकाश नाईक यांनी निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनाची दखल घेत प्रा. शिंदे यांनी जलसंपदा विभागाला निर्देश दिले.

दरम्यान, इसापूर धरण परिसरात राजे नोवसाजी नाईक यांचे स्मारक उभारले गेल्यास हा परिसर ऐतिहासिक पर्यटनस्थळ म्हणून विकसित होईल. त्यामुळे स्थानिक नागरिक व इतिहासप्रेमींमधून समाधान व्यक्त होत आहे.

अल्पवयीन मुलीवर अत्याचार; तरुणावर गुन्हा

वसमत, ता. ३० (बातमीदार) : वसमत तालुक्यातील एका गावात अल्पवयीन मुलीसोबत ओळख वाढवून तिच्यावर अत्याचार केल्याच्या आरोपावरून तरुणावर कुरुंदा पोलिस ठाण्यात रविवारी (ता. २९) गुन्हा दाखल झाला आहे. मुलगी पाच महिन्याची गर्भवती झाल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला.

वसमत तालुक्यातील राजदरी येथील विजय कऱ्हाळे एका गावातील नातेवाइकांकडे आला होता. गावात काही दिवस राहिल्यानंतर त्याने अल्पवयीन मुलीशी ओळख वाढवली. मुलीशी प्रेमाच्या जाळ्यात ओढून शेतात अत्याचार केला. दरम्यान, विजय मुलीस वारंवार भेटण्यासाठी येत होता. काही दिवसानंतर मुलीच्या पोटात दुखत होते शिवाय तिला अस्वस्थ वाटत असल्याने कुटुंबीयांनी तिला उपचारासाठी एका रुग्णालयात नेले. डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर मुलगी गर्भवती असल्याचे सांगितले. कुटुंबीयांनी तिच्याकडे विचारणा केली असता तिने विजयने प्रेमाचे नाटक करून अत्याचार केल्याचे सांगितले. या प्रकारानंतर तिच्या कुटुंबियांनी कुरुंदा पोलिस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. यावरून पोलिसांनी विजय कऱ्हाळेविरुध्द बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. सहाय्यक पोलिस निरीक्षक रामदास निरदोडे, उपनिरीक्षक गंधकवाड, कारामुंगे पुढील तपास करीत आहेत. पोलिसांनी आरोपीच्या अटकेसाठी पथके रवाना केली आहेत.

पंजाब नॅशनल बँक (भारत सरकारचा उपक्रम) | pnb punjab national bank (A Govt. of India Undertaking)

एआरएमबी, नाशिक
शॉप नं.2 व 3 मेझनाईन मजला, स्नेह हाईट अपार्टमेंट, इंदिरा नगर, नाशिक - 422009. फोन : 0253- 2323020, ईमेल- cs8288@pnb.bank.in

सेक्युरिटी इन्टरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 मधील नियम 8 व 9 अन्वये तमाम लोकांकरीता ई-लिलाव विक्री नोटीस

स्थावर / अस्थावर मिळकतींची विक्री करण्याकरीता ई-लिलाव विक्री नोटीस
(सरफेसी कायदा, 2002 मधील नियम 8(6) अन्वये वैधानिक विक्री नोटीस)

सेक्युरिआयझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट ॲन्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टरेस्ट ॲक्ट 2002 कलम 13 (4) अंतर्गत मधील नियम 8(6), सेक्युरिटी इन्टरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 च्या अन्वये स्थावर / अस्थावर मिळकतींची विक्री ई- लिलाव पध्दतीने करण्या संदर्भात

तमाम लोकांस व विशेषतः कर्जदार व हमीदार ज्यांचे वर्णन खालील तक्तामध्ये केले आहे त्यांना सदर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमूद स्थावर/ अस्थावर मिळकती ज्या सेक्युअर्ड क्रेडीटर यांचेकडे गहाण / ताब्यामध्ये आहेत, ज्याचा रचनात्मक / प्रत्यक्ष / प्रतिकात्मक ताबा अधिकृत अधिकारी, पंजाब नॅशनल बँक, सेक्युअर्ड क्रेडीटर यांनी घेतला आहे. अधिकृत अधिकारी, त्यांची विक्री **"जसे आहे तसे", "जिथे आहे तिथे" व "जशी आहे" त्या स्थितीत" खालील तारखेस** कर्जदार/ गहाणदार / हमीदार यांचेकडून देय रक्कम वसूल करण्याकरीता, पंजाब नॅशनल बँक, सेक्युअर्ड क्रेडीटर, यांचेव्दारे करण्यात येणार आहे. राखीव किंमत व अनामत रक्कम व स्थावर मिळकतीचे किमान वर्णन व त्यावर असलेला बोजा (काही असल्यास) यांची माहिती खालीलप्रमाणे

लॉट क्र.	शाखेचे नाव खात्याचे नाव कर्जदार / जामीनदाराचे नाव आणि पत्ता	मिळकतीचे वर्णन आणि कर्जदार / गहाणदार यांची नावे	अ) मागणी सूचनाकलम १३(२) प्रमाणे दिनांक ब) थकबाकी रक्कम दि. ३१.१२.२०२५ रोजी क) ताबा दिनांक कलम १३(४) सरफेसी कलम २००२ प्रमाणे अ) ताबा प्रकार सांकेतिक / प्रत्यक्ष /रचनात्मक	अ) अनामत रक्कम (रु. लाख) ब) ईएमडी (ईएमडी जमा करण्याची शेवटची तारीख) क) बोली वाढीव रक्कम	लिलावाचे दिनांक व वेळ	कर्जदारांच्या बोझाचा तपशील
१	**शाखा- पीएनबी - हिंगोली (७९०४००) कर्जदार - मे. गणराज कृषी केंद्र दिग्रस कऱ्हाळे** पत्ता - मालमत्ता नं. १५४८, मेन रोड, दिग्रस (के.) ता. हिंगोली, जि. हिंगोली-४३१७०५ **प्रोप्रायटर श्री. माधव किसन कऱ्हाळे** पत्ता - व्हीपीओ दिग्रस कऱ्हाळे, ता. हिगोली, जि. हिंगोली - ४३१ ७०५ **जामीनदार / तारणदार - श्री. साहेबराव किसनराव कऱ्हाळे** पत्ता - व्हीपीओ दिग्रस कऱ्हाळे, ता. हिंगोली, जि. हिंगोली - ४३१ ७०५	१. मालमत्ता नं. १५४८, सर्व्हे नं. १२११, मेन रोड, दिग्रस (कऱ्हाळे), ता. आणि जिल्हा हिंगोली. क्षेत्रफळ एरिया ३५० स्क्वे.मी. (अंदाजे) **मालकी हक्क - श्री. माधव किसन कऱ्हाळे चतुःर्सिमा - पुर्व -** सरस्वती गिरीची जमीन , **पश्चिम -** सावली रोड, **दक्षिण -** शिवचरण गिरी यांची जमीन, **उत्तर -** रामचंद्र सोनाजी काळे यांची जमीन **मालमत्ता आयडी - PUNB7NZ78227198** २. मालमत्ता नं. ५७६, मेन रोड, दिग्रस (कऱ्हाळे), ता. आणि जिल्हा हिंगोली. **क्षेत्रफळ एरिया १११.४८ स्क्वे.मी. मालकी हक्क - साहेबराव किसनराव कऱ्हाळे चतुःर्सिमा - पुर्व -** श्री. शिवाजी प्रभुजी कऱ्हाळे यांची मालमत्ता,**पश्चिम -** रस्ता, **उत्तर -** श्री. गणपती सुरुशे यांची मालमत्ता, **दक्षिण -** श्री. रमेश कऱ्हाळे यांची गल्ली मालमत्ता **मालमत्ता आयडी - PUNB7NZ78234317**	अ) १८.०५.२०२४ पेपर प्रसिध्दी दिनांक १३.०७.२०२४ ब) रु.३०,८३,४०२.२४ + इतर व्याज श्री क) २५.०९.२०२४ ड) सांकेतिक ताबा	१. अ) रु. १७.४० लाख ब) रु. १.७४० लाख (२८.०४.२०२६) क) रु. ०.१० लाख १. अ) रु. ९.४३ लाख ब) रु. ०.९४३ लाख (२८.०४.२०२६) क) रु. ०.१० लाख	दि. २८.०४.२०२६ वेळ सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत	माहित नाही

विक्री ही सेक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ च्या विहित केलेल्या अटी व शर्ती खालील प्रमाणे
1. मालमत्तेची विक्री जशी आहे तशी आणि जशी आहे तशी आणि जे काही आहे ते आहे वर विक्री केली जात आहे.
2. खाली नमूद सुरक्षीत मालमत्तेची माहिती ही अधिकृत अधिकाऱ्यांच्या सर्वोत्तम माहितीनुसार नमूद केली आहे, परंतू अधिकृत अधिकारी हे त्यामध्ये असलेल्या कोणत्याही तृटीस, चुकीची माहितीस वा काही चुकल्यास उत्तर देण्यास जबाबदार राहणार नाहीत.
3. सदर विक्री ही दिनांक, **28.04.2026** @ सकाळी 11.00 ते संध्या. 4.00 वर **https://baanknet.com** वेबसाईटवर प्रदान केलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्मव्दारे खाली दिलेल्या स्वाक्षरीकर्ताव्दारे केली जाईल
4. ई-लिलावात सहभागी होण्यासाठी बोलीदाराने राखीव किंमतीपेक्षा किमान एक बोली अनिवार्यपणे सादर करणे आवश्यक आहे.
5. विक्रीच्या तपशीलावर अटी व नियमांसाठी कृपया **www.pnb.bank.in.** आणि **https://baanknet.com** ही वेबसाईट पाहावी

दिनांक - ३०.०३.२०२६
स्थळ - नाशिक

टीप : स्वैर भाषांतर; तफावत आढळल्यास मूळ इंग्रजी मजकूर ग्राह्य

स्वाक्षरी/-
श्री. वेंकटेश एस.
मुख्य व्यवस्थापक आणि अधिकृत अधिकारी,
पंजाब नॅशनल बँक, (सिक्युअर्ड क्रेडिटर)

कांचन गुंडेवार यांचे निधन



हिंगोली : शहरातील यशवंतनगर येथील रहिवासी कांचन प्रभाकर गुंडेवार (वय ६४) यांचे सोमवारी (ता. ३०) दुपारी १२.५० वाजता निधन झाले. त्यांच्यावर साडेपाच वाजता कयाधू नदीकाठावर अंत्यसंस्कार करण्यात आले. संचित गुंडेवार यांचे ते वडील होत.

साखरा मार्गे बंद असलेली बस सुरू करण्याची मागणी

साखरा, ता. ३० (बातमीदार) : जिंतूर आगाराच्या बस साखरामार्गे बंद असल्याने प्रवाशांना नाहक त्रास सहन करत खासगी वाहनाने प्रवास करावा लागत आहे.

या मार्गावरील बंद करण्यात आलेल्या बस पूर्ववत सुरू करून प्रवाशांची होणारी गैरसोय दूर करावी, अशी मागणी होत आहे. कोरोना अगोदर या मार्गाने जिंतूर आगाराच्या तीन ते चार बस धावत होत्या. मात्र कोरोनामुळे ही बससेवा बंद झाली. कोरोनाचा उद्रेक जसजसा कमी होत गेला, तशा बस धावू लागल्या. त्यानंतर सगळीकडे बस धावत असताना जिंतूर-रिसोड-साखरामार्गे बस मात्र धावल्याच नाहीत. अनेकवेळा मागणी केली, निवेदनही देण्यात आले. साखरा, केलसुला, उटी ब्रह्मचारी, पाटोदा या गावातील ग्रामपंचायतीने ठराव देऊन मागणी केली. त्यानंतर एक बस केवळ आठ दिवस धावली. त्यानंतर परत बंद करण्यात आली. दिवाळी सणाला प्रवाशांनी बस सुरु करण्याची मागणी केली. मात्र, कोणीच दखल घेतली नाही. आता उन्हाळा असून लग्नसराई व इतर कार्यक्रमही असतात. आता तरी बस सुरू करावी, अशी मागणी होत आहे.

आमच्यासारख्या ज्येष्ठ नागरिकांना खासगी वाहनाने प्रवास करने सोईस्कर नाही. महामंडळाने या मार्गावरील बस सुरू करून आमची होणारी गैरसोय टळेल. बससाठी जिंतूर आगार प्रमुखांना निवेदन दिलेले आहे. मात्र, नियमित बस धावलीच नाही.

-दगडूजी डव्हळे, ज्येष्ठ नागरिक

झन्नामन्ना जुगार खेळणारे चौघे ताब्यात

शिरड शहापूर : औंढा नागनाथ तालुक्यातील माथा येथे झन्नामन्ना जुगार खेळणाऱ्या चौघांना औंढा नागनाथ पोलिसांनी ताब्यात घेत गुन्हा दाखल केला. ही कारवाई सोमवारी (ता. ३०) करणयात आली. पोलिसांना मिळालेल्या माहितीवरून जुगार खेळणाऱ्यांवर अचानक छापा टाकून चौघांना ताब्यात घेत जुगाराचे साहित्य, रोख २११० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलिस शिपाई राजकुमार कुटे यांच्या तक्रारीवरून दाजीबा राजाराम आंधळे, सदाशिव बाबाराव कुटे, माणिक श्रीरंग सातपुते, गजानन धोंडबाराव गीते यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास जमादार गजानन गिरी करत आहे. पथकात पोलिस निरीक्षक जी. एस. राहिरे, पोलिस उपनिरीक्षक दत्ता कानगुले, अमोल इंगोले, जमादार गजानन गिरी, वसीम पठाण, जयदीप जाधव, इक्बाल शेख, राजकुमार कुटे यांचा समावेश होता.

